**C**

**CCE PF**
**CCE PR**
**REVISED**

ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢ ಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD, MALLESWARAM, BANGALORE – 560 003**

ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಪರೀಕ್ಷೆ, ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್, 2019

**S. S. L. C. EXAMINATION, MARCH/APRIL, 2019**

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

**MODEL ANSWERS**

ದಿನಾಂಕ : 21. 03. 2019 ] ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

Date : 21. 03. 2019 ] **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ & ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh & Private Repeater )**

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125

[ Max. Marks : 125

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - A** <br> **( गद्य पद्यांशावर आधारीत )** | |
| I. | खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : $16 \times 1 = 16$ | |
| 1. | ‘अनंतशक्ती परमेश्वर’ या पाठाचे मूल्य काय ? | |
| | **उत्तर :** ज्ञान, उत्सुकता. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | कोणत्या अंधाला हत्ती सुपासारखा वाटला ? | |
| | **उत्तर :** कान पाहणाऱ्यास | 1 |
| 3. | सुतार सरदाराचे नाव काय ? | |
| | **उत्तर :** अंजुरकर पंचकळशे | 1 |
| 4. | महात्मा ज्योतीबा फुलेंच्या दत्तक पुत्राचे नाव काय ? | |
| | **उत्तर :** यशवंत | 1 |
| 5. | सावित्रीबाईंचा जन्म कोणत्या गावी झाला ? | |
| | **उत्तर :** नायगाव | 1 |
| 6. | गायी कोण हाकतो आहे ? | |
| | **उत्तर :** नेनंता गुराखी | 1 |
| 7. | 'पीकपाणी' हा कवितासंग्रह कोणी लिहिला ? | |
| | **उत्तर :** इंद्रजित भालेराव | 1 |
| 8. | वेल कोठे चढते ? | |
| | **उत्तर :** मांडवावर | 1 |
| 9. | चुलीतल्या लाकडाने कुठे जळावे ? | |
| | **उत्तर :** चुलीत | 1 |
| 10. | स्त्रीया आपले दुःख कुठे पुरुन ठेवतात ? | |
| | **उत्तर :** मातीखाली | 1 |
| 11. | अभंगाचे बळ कसे आहे ? | |
| | **उत्तर :** अमर्याद | 1 |
| 12. | 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या लघुनिबंध संग्रहातून घेतला आहे ? | |
| | **उत्तर :** उघड्या खिडक्या | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 13. | डॉ. कोल्हे यानी आयोजीत केलेल्या शिबिरातून किती कार्यकर्ते तयार झाले ? | |
| | **उत्तर :** 500 | 1 |
| 14. | कशाची उंडी ज्ञानेश्वर कावळ्याच्या तोंडाला लावणार आहेत ? | |
| | **उत्तर :** दहीभाताची | 1 |
| 15. | भीमक कोणत्या देशाचा राजा होता ? | |
| | **उत्तर :** विदर्भ | 1 |
| 16. | कष्टाची माळ म्हणजे काय ? | |
| | **उत्तर :** सतत येणारे कष्ट / संकटे. | 1 |
| II. | खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 13 × 2 = 26 | |
| 17. | "तुम्ही त्याशी कशासाठी भांडता ? तो पुण्यवान आहे." संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. | |
| | **उत्तर :** | |
| | **संदर्भ :** | |
| | पाठाचे नाव — वसईचा वेढा 1 | |
| | लेखक — कृष्णाजी विनायक सोहनी | |
| | कोणी कोणास — फिरंग्याच्या बायकोने फिरंग्यास म्हटले | |
| | **स्पष्टीकरण :** | 2 |
| | फिरंग्याची बायको जहाजातून जाताना तिला पकडले व श्रीमंतांकडे आणिली, त्यांनी तिला साडी चोळी करुन पाठवली तेंव्हा तीने जाऊन आपल्या नवऱ्यास वर्तमान सांगून हे वाक्य उद्गाराले. 1 | |
| 18. | आत्मविश्वासाने आंबेडकरांनी काय मिळविले ? | |
| | **उत्तर :** मुंबईमधील डिपार्टमेंटच्या चाळीत दहा × दहा च्या रुममध्ये राहून एका पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला. | 2 |
| | इंग्लंडमध्ये राहून 8 वर्षाचा अभ्यासक्रम 2 वर्षे तीन महिन्यात यशस्वीपने पार केला. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 19. | गंगुबाईंनी आपल्या गुरूंना कोणती गुरूदक्षिणा दिली ?<br>**उत्तर :** आपली मुलगी कृष्णा हिला शिकविण्याची विनंती केली आणि त्यासाठी त्यांना 50 रु. फी देखील दिली.<br>त्यांना राहण्यासाठी फूकट घर दिले. | 2 |
| 20. | 'संत ज्ञानेश्वरांच्या' साहित्याची माहिती लिहा.<br>**उत्तर :** त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षी<br>'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ पूर्ण केला<br>'अमृतानुभव,' 'चांगदेवपासाष्टी' इत्यादी ग्रंथ लिहिले तसेच अनेक अभंग स्फूट रचना, पदे इ. साहित्य लिहिले. | 2 |
| 21. | 'पाहुणे' कसे निगरगट्ट आहेत ते सांगा ?<br>**उत्तर :** ओसरीवर खूप वेळ झोपतात<br>राजरोस पणे डबा उघडूनि लाडवावर हल्ला करतात. आणि बाबांच्या पेटीतून विडयांचे जुडगे पळवितात व खूप दिवस तळ ठोकतात. आणि घरात कसेही वावरतात. | 2 |
| 22. | 'धरण' बांधताना तिने कोणते कष्ट सोसले ?<br>**उत्तर :** सकाळी लवकर उठून कणी कोंडा पाखडते. उन्हापासून संरक्षण होण्यासाठी पायाला पाला बांधते व घोटभर पाण्यासाठी सारं रान घुंडाळते. | 2 |
| 23. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय थोडक्यात लिहा.<br>**उत्तर :**<br>पूर्ण नाव – डॉ. भीमराव रामजी अंबेडकर<br>कालखंड – 1891 - 1956<br>कार्य – घटनेचे शिल्पकार, कायदामंत्री होते<br>प्रभूत्व – कायदेशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र<br>पुरस्कार – भारत रत्न<br>ग्रंथ – हू वेअर दि शुद्राज ?, थॉट्स ऑफ पाकिस्तान, बुद्ध ॲण्ड हिज धम्म. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 24. | सर्व सरदारांनी चिमाजीआप्पांना काय सांगितले ?<br>**उत्तर :** जो आपला निश्चय झाला तोच नेम आमचा आहे. परंतु काहीतरी किल्ल्यातील भेद समजल्याशिवाय किल्ला हस्तगत होणे कठीण यासाठी मसलत करावी मगच दुसरा विचार किल्ला घेण्याचा ठरवू. | 2 |
| 25. | वाटणीच्या घोळाने घरांत काय घडत होते ?<br>**उत्तर :** वाटणीचा घोळ सहा महिन्यापासून चालू होता घरातल्या कटकटी अधिकच वाढल्या होत्या.<br>कधी शेतातली कामे खाळबून रहात तर कधी चूल बंद पडत होती.<br>आठ दिवसापासून हा प्रकार वाढला होता. | 2 |
| 26. | फुले शाळेत कशा प्रकारे मश्गुल असायचे ?<br>**उत्तर :** ही मोठमोठी पुस्तक वाचत बसायचे अभ्यास करत बसायचे, लिखान करायचे त्यांचे मित्र सर्व जातीधर्माचे असायचे ते शाळत चर्चेसाठी यायचे. | 2 |
| 27. | वर बोट करुन आई आपल्या बाळयाला काय सांगते ?<br>**उत्तर :** आई बाळयाला बोट करुन म्हणते की हळू बोल<br>कावळे गिधाडे, घारी जेथून येतात तेथून हे आलेले आहेत तसेच<br>डोंगळे, डांस, घगरटी बाळारे जेथून येतात तेथून हे आले आहेत. | 2 |
| 28. | कामावर जाण्यापूर्वी पहाटेला ती कोणती कामे करते ?<br>**उत्तर :** जात्यावर दळ्न पीठ तयार करते<br>कणी कोंडा पाखडून रांधतात<br>आपल्या तान्हया बाळाला पाटीखाली<br>झोपवून कामावर जाते. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 29. | तिच्या संसाराला वणवा का म्हंटले आहे ?<br>**उत्तर :** अपार कष्ट घेऊन येतात सर्व ऋतू<br>आयुष्यात सतत दु:ख असतात<br>दु:ख मातीखाली पेरुन ठेवातात<br>पायांना पाने बांधून वाट तुडवते म्हणून<br>तिच्या संसाराला वनवा म्हंटला आहे. | 2 |
| III. | खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30 | |
| 30. | लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?<br>**उत्तर :**<br>8 च्या सुमारास छकड्यातून आल्या. दान ट्रंक व एक छानदारशी वळकटी सोबत होती शेजारी बाजाची पेटी, मागल्या ट्रंकेवर आजीबाई विराजमान झाल्या होत्या. पोपटाचा पिंजरा धरुन ठेवला होता. डाव्या बगलेत बोक्याचे डोके होते सामान लखकालाच उतरावायला लावलं. | 3 |
| 31. | लेखकांनी कोणती छत्री निवडली ? का ?<br>**उत्तर :** लेखकांनी कोपऱ्यातली मोडकी-तोडकी छत्री निवडली.<br>त्यांची अशी धारणा होती की आपण छत्री ही फक्त दुसऱ्यांना दाखविण्यासाठी लोकं नावं ठेवू नयेत म्हणून घेतो. त्यासाठी त्यांनी छान गणित घालून समजावलच की आपण लोकांची तोंड बंद करण्यासाठी छत्री घेत आहोत. | 3 |
| 32. | शिबिर घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का झाले ?<br>**उत्तर :** कारण ते शिक्षक बाहेर गावाहून आले असल्यामुळे अदिवासी वातावरण व परस्थितीशी गुळवून घेताना त्यांची चिडचिड व्हायची.<br>पिढयानपिढया अक्षरशत्रु असलेल्या अदिवासींच्या मुलांना शिकविण्याची तळमळ त्यांच्यापाशी नसायची.<br>ते म्हणायचे 'ये अदिवासी कभी नहीं बदलेंगे' व सतत नाखूष राहायचे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 33. | तात्यांना कोणत्या मुलाचा राग येत होता ? का ?<br>**उत्तर :** तात्यांना धाकट्या मुलाचा खूप राग येत असे कारण वाटणी करण्यासाठी पुढाकार त्याचाच होता.<br>त्यांनी रात्रंदिवस राबून सत्तावीस एकर जमीन ठेवली होती.<br>त्यातली निम्म्या पेक्षा जास्त जमीन त्यांनी स्वःता मिळविली होती व त्या जमीनीचा धाकटा मुलगा 'लंगोटभर' जमीन असा नेहमी उच्चार करायचा.<br>म्हणून त्यांना धाकट्या मुलाचा राग येत होता. | 3 |
| 34. | आडावरुन घागर घेऊन येताना लेखक कोणत्या प्रश्नांच ओझं घेऊन आले ?<br>**उत्तर :** आक्का इतकी उदास कशी ? माझ्या यशाचा तिला आनंद वाटत नसेल का ? तो आनंद ती का व्यक्त करत नाही ? आपल्या पोटाचा प्रश्न सुटला असता तर अक्काने आनंद व्यक्त केला असता का ? आनंद व्यक्त करण्यासाठी तिच्याकडे बळच नसेल का ? | 3 |
| 35. | श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?<br>**उत्तर :** ती म्हणते हे पद्मनाभा ही माझी इच्छा पूर्ण नाही झाली तर मी माझी जीभ हसडून जीव दईन. त्यानंतर पुढे शंभर जन्म घेऊन उग्र तपश्चर्या करेन आणि प्रत्यक्ष भगवान शंकरही ज्याला वंदन करतो असे श्रीकृष्णाचे पाय मी मिळवणार आहे. | 3 |
| 36. | 'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणतो ?<br>**उत्तर :** मठातील संन्याशानी धर्मप्रसार भक्ती प्रसार करावा; पण ते सोडून नुसतेच जे ढोंग भाजवतात. या ढोंगी पणावर ते टीका करताना म्हणतात.<br>हा जन्म परत मिळणार नाही. तू मठाची उठाठेव करु नकोस, जटा वाढवू नकोस ढोंगीपणा करु नकोस, होम हवन करू नकोस.<br>तू फक्त हरीची सेवा कर यासाठी ते जरातरी समज धरी अंतरी असे म्हणतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 37. | 'कुसुमाग्रज' यांच्या थोडक्यात परिचय लिहा.<br>**उत्तर :**<br>पूर्ण नाव – विष्णू वामन शिरवाडकर<br>कालखंड – ( 1912 - 1999 )<br>वास्तव्य – नाशिक<br>ओळख – आग्निसंप्रदायी व मानवतावादी कवी<br>काव्यसंग्रह – जीवनलहरी, विशाखा, इत्यादी<br>कांदबरी – वष्णवी, जान्हवी, कल्पनेच्या तिरावर<br>लघूकथा – फूलवाली<br>नाटक – दुरचे दिवे, नटसंम्राट, इत्यादी<br>ज्ञानपीठ पुरस्कार 1988 साली. | 3 |
| 38. | बेळगावी काँग्रेस मधील घटनांचे वर्णन करा.<br>**उत्तर :** गंगुबाईच्या आयुष्यातील महत्वाची घटना 1924 च्या बेळगावी काँग्रेसचे स्वागत गीत म्हंटले - गाँधीजींनी शाबासकी दिली.<br>अनेक मान्यवर आले होते. सर्वांनी स्तूती केली जातीवरुन आपला आपमान होईल असे त्यांना वाटले होते, पण तसे कांहीच झाले नाही.<br>जेवताना लोक पंक्तीवरुन उठवतील असही वाटले होते पण तसेही झाले नाही.<br>म्हणून ही घटना त्यांना दिर्घकाळ स्मरणात राहीली. | 3 |
| 39. | गुराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो ?<br>**उत्तर :** लहाणपणी जसा कृष्ण गाई-गुरे चारावयास जायचा त्याच वयात हा गुराखीही जनावरे चारायला जायचा पण हे करताना त्याला खूप त्रास झाला. जसे पाऊस आल्यावर गायीच्या पोटाशी थांबले, काटयाकुटयातून जाणे इतक अपार कष्ट करुनही त्याला घरी आल्यावर दुध भात देखील खायला मिळत नाही म्हणून तो कृष्ण झाला नाही असे कवी म्हणतात. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IV. | खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20 | |
| 40. | 'जपानी' स्त्रीचे सविस्तर वर्णन करा.<br>**उत्तर :**<br>* दिसायला गोड, लाघवी, शालीन, हसरी<br>* कुठल्याही हॉटेलात सरबराई करण्यात गढलेली टीप घेणे कमीपणाचे समजते<br>* बहुतेक प्रत्येक क्षेत्रात सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रातही तो अग्रेसर<br>* ट्रॅम कंटक्टर, बस कंडक्टर, दुकानातील विक्रेत्या असे अनेक कामे फक्त स्त्रीयांसाठी राखीव<br>* 18 - 19 वर्षाच्या मुली रात्री अपरात्री कामे करतात<br>* आपल्या लग्नाची व्यवस्था स्वःता करतात<br>* राजकन्याही नम्र आहेत<br>* सर्व सामाजिक संस्थांच्या अध्यक्षा<br>* 1819 च्या भुकंपानंतर व 1945 च्या बॉंब हल्ल्यानंतर जपानला सावरण्यात मोलाचा वाटा. | 4 |
| 41. | 'हिरवे सांगाती' या पाठातील वृक्षांची माहिती लिहा.<br>**उत्तर :** 'हिरवे सांगाती' या पाठात अनेक वृक्ष आले आहेत<br>त्यापैकी पिंपळ, जाभूळ, कडुनिब, चाफा, पपई, बांबू<br>1) पिंपळ — पुरातन वृक्ष, मानवो रेणूशी मिळते-जुळते वाट्सरूला सावली, खेळात पानाचा उपयोग.<br>2) जांभूळ — लहाणपणीचा गारवा, वयस्कर व्यक्तीप्रमाणे वाटतो. त्याच्या सावलीत बाळ खेळताना आई निर्धारत.<br>3) चाफा — बडी माँ<br>4) पपई — तीनवेळेस फळ दिल की ही झाडं मरतात<br>5) बांबू — वनातला वारा सोंय सोंय असा शीळ जणू काही तो 'साई-साई' असे म्हणतो<br>6) मोसंबी | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | 'गाऊ त्यांना आरती' कवितेचा सारांश लिहा.<br>**उत्तर :** या कवितेत कवीने राष्ट्र व समाज यांच्यासाठी त्याग व बलिदान देणाऱ्यांचा गुणगौरव केला आहे.<br>तसेच सैनिक, देशभक्त, दृष्टे समाज सेवक संत यांचाही गुणगौरव केला आहे.<br>राष्ट्राला दारीद्रयातून मूक्त करण्या साठी जे कर्णा प्रमाणे प्राणाची पर्वा न करता लढले.<br>गोंधळलेल्या भरकटलेल्या लोकांना ज्यांनी कृष्णाप्रमाणे मार्ग दाखवीला सौभद्राप्रमाणे मृत्यू समोर असता नाही जे हसत मत्यूला सामोर गेले. मार्कंडेया प्रमाणे देशच ज्यांचा देव आहे त्यांनी काळाला जिंकले.<br>अशा अनेक दाखल्यांनी ही कविता नटलेली आहे. | 4 |
| 43. | 'भारत' कसा असावा असे संत तुकडोजी महाराजांना वाटते ?<br>**उत्तर :** भारतातील लोक आनंदाने व गुण्यागोविंदाने नांदावेत, सर्वधर्म समभाव रहावा अस्पृश्यता नष्ट होऊन सर्वांनी एकोव्याने रहावे. अशी त्यांची तळमळ आहे.<br>गरीब-श्रीमंत, हिंदू-मुस्लीम, शीख-इसाई असा भेदभाव नसावा.<br>मानवता हाच धर्म श्रेष्ठ असे मानले जावे<br>सर्व जाती धर्माची मिळून एकत्र प्रार्थना व्हावी<br>प्रत्येक तरुण उद्योगी व शीलवान असावा भीती नष्ट हाऊन प्रत्येक घरात सौंदर्य रमावे.<br>असा भारत सुजलाम सुफलाम व्हावा असे तुकडोजी महाराजांना वाटते. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 44. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा —<br>कवच भूमिचे ............................................................<br>......................................................................<br>......................................................................<br>.................................................... आज असे सत्कार.<br>**उत्तर :**<br>कवच भूमिचे आणि अचानक<br>भेदुनि आले हिरवे कौतुक<br>नचिकेताचे स्वप्नच अथवा अवचित ले साकार<br>पहिल्या हिरव्या तृणपाताचा आज असे सत्कार. | 4 |
| | **विभाग - B**<br>**( व्याकरणावर आधारीत )** | |
| V.<br>45. | खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10<br>'संधी' म्हणजे काय ?<br>(अ) फायदा (ब) सांधने<br>(क) सांधणे (ड) साधन.<br>**उत्तर :** (क) सांधणे | 1 |
| 46. | विभक्तीचे एकुण प्रकार किती ?<br>(अ) पाच (ब) सात<br>(क) तीन (ड) आठ.<br>**उत्तर :** (ड) आठ | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 47. | 'आक्का गंभीरच होत होती' वाक्याचा प्रयोग ओळखा.<br>(अ) कर्तरी प्रयोग (ब) भावे प्रयोग<br>(क) कर्मणी प्रयोग (ड) या पैकी नाही.<br>**उत्तर :** (अ) कर्तरी प्रयोग | 1 |
| 48. | 'माधवी नृत्य करत आहे' वाक्याचा काळ ओळखा.<br>(अ) वर्तमान काळ (ब) अपूर्ण वर्तमान काळ<br>(क) भूत काळ (ड) अपूर्ण भूत काळ.<br>**उत्तर :** (ब) अपूर्ण वर्तमान काळ | 1 |
| 49. | 'सुपातील हसतात् जात्यातील ............. ' म्हण पूर्ण करा.<br>(अ) रडतात (ब) नाचतात<br>(क) धावतात (ड) ओरडतात.<br>**उत्तर :** (अ) रडतात | 1 |
| 50. | 'तू खेळ आणि अभ्यास कर.' हे या प्रकारचे वाक्य आहे –<br>(अ) केवल वाक्य (ब) मिश्र वाक्य<br>(क) संयुक्त वाक्य (ड) उद्‌गारार्थी वाक्य.<br>**उत्तर :** (क) संयुक्त वाक्य | 1 |
| 51. | 'पदोपदी' हा या प्रकारचा समास आहे –<br>(अ) अव्ययीभाव समास (ब) द्वंद्व समास<br>(क) समाहार द्वंद्व समास (ड) द्विगू समास.<br>**उत्तर :** (अ) अव्ययीभाव समास | 1 |
| 52. | 'सावकाश होत जाणारा बदल' शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.<br>(अ) क्रांती (ब) उत्क्रांती<br>(क) उसासा (ड) उद्वीग्न.<br>**उत्तर :** (ब) उत्क्रांती | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 53. | ''तो नदीत पोहत आहे'' या वाक्यातील 'तो' या शब्दाची जात ओळखा.<br>(अ) नाम (ब) सर्वनाम<br>(क) विशेषण (ड) क्रियापद.<br>**उत्तर :** (ब) सर्वनाम | 1 |
| 54. | संस्कृत भाषेतून मराठीत येताना थोडाफार बदल करुन आलेल्या शब्दांना असे म्हणतात —<br>(अ) तत्सम (ब) तद्भव<br>(क) परभाषिय (ड) देशी.<br>**उत्तर :** (ब) तद्भव. | 1 |
| VI. | खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा :<br>4 × 1 = 4 | |
| 55. | आळी : गल्ली : : आरमार : .............<br>**उत्तर :** नौदल | 1 |
| 56. | आशा : निराशा : : निरक्षर : .............<br>**उत्तर :** साक्षर | 1 |
| 57. | आई : स्त्रीलिंग : : हिमालय : .............<br>**उत्तर :** पुल्लींग | 1 |
| 58. | वाक्यालील महत्वाचा शब्द : ' ' : : बोलणाऱ्याच्या तोंडचे वाक्य : .............<br>**उत्तर :** " " | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| VII. | सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$ | |
| 59. | अरे वेड्या सोनचाफ्या । काय तुझारे बहर नाही पाहिलीस माझी । चाफेकळी सोनगौर.<br><br>अलंकार ओळखा, लक्षणे लिहा<br><br>**उत्तर :** चेतनगुणोक्ती अलंकार<br>**लक्षणे** — निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहे आणि ती मानवाप्रमाणे कार्य करते असे जेथे वर्णन केलेले असते तेथे 'चेतनगुणोक्ती' अलंकार होतो. | 2 |
| 60. | 'झालेच मित्र पण सोडुनि पाठ मोरे' गण पाडून वृत्त ओळखा.<br><br>**उत्तर :**<br><br>वसंततिलका<br><br>लक्षणे — अक्षरगण वृत्त आहे<br>अक्षरे — 14<br>यदी — 8 व्या अक्षरावर<br>गण — त भ ज ज ग ग.<br><br>झालेच मित्र पण सोडुनि पाठ मोरे<br>– – U \| – U U \| U – U \| U – U \| – –<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग | 2 |
| 61. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br><br>i) अध:पतन होणे<br><br>ii) भान हरपण.<br><br>**उत्तर :**<br><br>(i) अध:पतन होणे — दर्जा घसरणे 1<br>(ii) भान हरपणे — स्व:ताला विसरणे. 1<br>( वाक्यात वाक्प्रचाराचा उपयोग व्हावा ) | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **विभाग - C**<br>**( लेखन व रचनेवर आधारीत )** | |
| VIII. 62. | खालील पैको **एका** कल्पनेचा विस्तार करा : $1 \times 3 = 3$<br>i) 'सत्यमेव जयते'<br>ii) जसे कर्म; तसे फळ.<br>**उत्तर :**<br>कल्पनाविस्तार ( उत्तराचे मुद्दे )<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे ( शब्दशः अर्थ ) 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य. $\frac{1}{2}$ | 3 |
| IX. 63. | तुमच्या लहान भावास योगासनाचे महत्त्व सांगणारे पत्र लिहा.<br>**किंवा**<br>वाहनांच्या आवाजाचा होणारा त्रास व त्याचा अभ्यासावर होणारा परिणाम व्यक्त करणारे; पत्र पोलिस अधिक्षकास लिहा.<br>**उत्तर :**<br>i) प्रेषक पत्ता ( पाठवणाऱ्याचा पत्ता, तारखेसह ) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) समारोप व सही $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता. $\frac{1}{2}$ | 5 |
| | **अर्ज**<br>**उत्तर :**<br>i) प्रेषक पत्ता ( पाठवणाऱ्याचा पत्ता तारखेसह ) 1<br>ii) योग्य अधिकाऱ्याचा मायना 1<br>iii) विषय मांडणी 1<br>iv) मजकूर 1<br>v) सही व पत्ता ( कोणाला अर्ज पाठवायचा त्याचा ) 1 | 5 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| X. 64. | खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळी निबंध लिहा : $1 \times 5 = 5$<br>i) पर्यावरणाचे संरक्षण<br>ii) राष्ट्रीय एकात्मता काळाची गरज<br>iii) माझा आवडता नेता.<br>**उत्तर :**<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सजावट ( अलंकार वगैरेचा वापर ) 1<br>iv) शेवट. 1 | 5 |